दिनांक 22/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 72

विषय – विटा ता.खानापूर जि. सांगली येथे नियोजित साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा व शिल्पसृष्टी उभारणी करणेकामी निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 04/07/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) अध्यक्ष, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे पुतळा व शिल्पसृष्टी समिती, विटा यांचा आवक क्र.1939 दि.20/06/2025 रोजीचा अर्ज.

साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे पुतळा व शिल्पसृष्टी समिती, विटा ता.खानापूर जि.सांगली यांनी आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेकामी विनंती अर्ज सादर केला आहे. सदर सि.स.नं.1 ची जागा ही विटा नगरपरिषद मालकीची आहे. तसेच विटा शहर मंजूर विकास योजना (दुसरी सुधारीत) दि.30/10/2009 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास योजनेनुसार सि.स.नं.1 ची जागा पब्लिक / सेमी पब्लिक झोनमध्ये समाविष्ट असलेचे दिसून येत आहे. सदर ठिकाणी पुतळा व शिल्पसृष्टी समिती साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा लोकवर्गणीतून उभारणार आहे. पुतळा उभारणेस लागणा-या सर्व प्रकारच्या कायदेशीर बाबींची पुर्तता पुतळा समिती करणार आहे. पुतळा समितीने मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पुतळा बसविणेकामी शासकीय परवानगी मागितली असता त्यांनी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र:पुतळा-3116/प्र.क्र.308/29 मंत्रालय मुंबई दि.02/05/2017 मधील पुतळा धोरणाच्या अनुषंगाने परिपुर्ण प्रस्ताव दाखल करणेस सांगितले आहे.

1) शासन निर्णय क्र. स्मारक-3102/884/प्र.क्र. 122/2002/29 दि.02/02/2005.
2) शासन निर्णय क्र.स्मारक-3113/प्र.क्र. 308/29 दि.12/01/2016.
3) शासन निर्णय क्र.स्मारक-3116/प्र.क्र. 308/29 दि.02/05/2017.

वरील शासन निर्णयांच्या अटीस अधीन राहून सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणेत यावी. सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता झालेनंतर नगरपरिषद चबुतरा बांधून देणेस तयार आहे. तरी पुढील योग्य ती नियमबध्द कार्यवाही करणेस ही सभा मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा